RNI NO. - MAH / MAR / 1980 / 01823

Post Reg.No. - STR /019/ 2024 - 2026

email: weekly_lokjagar@rediffmail.com

साप्ताहिक

पत्रकारितेत सन १९८० पासून

# लोकजागर

वसा लोकजागृतीचा...

संस्थापक - रविंद्र बेडकिहाळ.

संपादक - रोहित वाकडे.

। वर्ष ४५ वे । । अंक ४८ वा । । दि. ०८ मार्च २०२५ ते दि. १४ मार्च २०२५ । । पाने ४ । । किंमत २ रुपये । । पान क्र. १ ।

७ वा स्मृतिदिन

भावपूर्ण श्रध्दांजली

दि.९ मार्च २०२५

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे
संस्थापक कुलपती, शिक्षणमहर्षी व आमचे मार्गदर्शक

मा.डॉ.पतंगराव कदम

यांना

।। विनम्र अभिवादन ।।



विजय मांडके - कार्यकारी विश्वस्त

कृष्णा शेवडीकर - उपाध्यक्ष

बापूसाहेब जाधव - उपाध्यक्ष

रविंद्र बेडकिहाळ - संस्थापक व अध्यक्ष

सर्व विश्वस्त व सदस्य महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी, फलटण, जि.सातारा.

# राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांना मासिक २० हजार सन्मान निधी मिळण्याचा मार्ग झाला सुलभ

## रविंद्र बेडकिहाळ यांनी शासनाचे मानले आभार

। लोकजागर । फलटण ।

**आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेअंतर्गत राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांना यापूर्वीच जाहीर करण्यात आलेले मासिक २० हजार अर्थसहाय्य मिळण्याचा मार्ग सुलभ केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार व ना. एकनाथ शिंदे यांना राज्यातील पत्रकारांच्यावतीने महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र बेडकिहाळ यांनी विशेष धन्यवाद दिले आहेत.**

याबाबत दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात रविंद्र बेडकिहाळ यांनी नमूद केले आहे की, ''राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेअंतर्गत दिले जाणार्या रुपये ११ हजाराच्या अर्थसहाय्यात वाढ करुन ते रुपये २० हजार करण्याचा शासन निर्णय गतवर्षी दि. १४ मार्च २०२४ रोजी झाला होता. मात्र हे अधिकचे अर्थसहाय्य ज्येष्ठ पत्रकारांना अद्याप दिले जात नव्हते. याबाबत महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीने वारंवार शासनाचे लक्ष वेधले होते. ही योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी शासनाने पत्रकारांच्या कल्याणार्थ स्थापन केलेल्या शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या स्थायी निधीमध्ये वाढ होणे आवश्यक असल्याचेही आम्ही शासनास निदर्शनास आणून दिले होते. आमच्या या मागणीनुसार आता ही अडचण दूर करण्यासाठी शासनाने शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या ठेव रक्कमेत ५० कोटीची वाढ करुन या निधीची एकूण ठेव रक्कम आता १०० कोटी केली आहे. या मुदत ठेव स्वरुपात गुंतवण्यात आलेल्या निधीच्या व्याजातून आता ज्येष्ठ पत्रकारांना मासिक २० हजार आर्थिक सहाय्य मिळण्याचा मार्ग सुलभ झाला आहे. या दोन्ही निर्णयाबाबतचे स्वतंत्र शासन निर्णय काल शासनाकडून निर्गमीत करण्यात आले आहेत'', असेही बेडकिहाळ यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

मराठी पत्रकारांच्या कल्याणार्थ कार्यरत संस्था

महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी



श्री.रविंद्र बेडकिहाळ

दरम्यान, ''सदर ज्येष्ठ पत्रकार सन्माननिधीतील ही रु. ९ हजार ची वाढ देताना ती याबाबतचा शासन निर्णय झाल्यापासून म्हणजेच दि. १४ मार्च २०२४ पासूनच्या फरकासह येत्या दि. ०१ एप्रिल पासून देण्यात यावी, अशी मागणी आम्ही यापूर्वीच शासनाकडे केली आहे. या मागणीचा शासनाने सकारात्मक विचार करावा'', असेही आवाहन रविंद्र बेडकिहाळ यांनी या पत्रकाद्वारे केले आहे.

# संपादकीय....

## राजकीय क्षितीजावरचा सोनहिरा

। लोकजागर ।

**संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर शिक्षण, राजकारण आणि समाजकारण या क्षेत्रांत भारती विद्यापीठाचे संस्थापक कुलपती, राज्याचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री, पलूस - कडेगांव मतदारसंघाचे भाग्यविधाते डॉ.पतंगरावजी कदम साहेब यांनी आपाल्या कर्तृत्त्वाची ठसठशीत नाममुद्रा उमटवली. त्यांचा जन्म ८ जानेवारी, १९४४ रोजी सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त भागातील ८०० लोकसंख्या असलेल्या सोनसळ या छोट्या खेड्यात सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. कुंडल येथील नाना पाटील बोर्डिंगमध्ये राहून त्यांनी आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमधून 'कमवा व शिका' या योजनेचा लाभ घेत त्यांनी प्रि-डिग्रीपर्यंतचे शिक्षण घेतले. पुढे पुण्याच्या वाडिया महाविद्यालयातून टीचर्स डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी रयत शिक्षर संस्थेच्या हडपसर, पुणे येथील साधना विद्यालयात अर्धवेळ शिक्षक म्हणून काम केले.**



ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी कोणत्या दिव्यातून जावे लागते, हे डॉ.पतंगरावजी कदम साहेब यांनी स्वत: अनुभवले होते. शैक्षणिक साधनांचा आणि सुविधांचा अभाव हेच ग्रामीण भागाच्या मागासलेपणाचे कारण असून शिक्षणाची गंगा बहुजन समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत नेल्याशिवाय या समाजाला उन्नतीचा प्रकाश दिसणार नाही हे जाणलेल्या डॉ.पतंगरावजी कदम साहेब यांनी 'गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन' हे ध्येय उराशी बाळगून वयाच्या १९ व्या वर्षी १० मे, १९६४ रोजी पुण्यात कसबा पेठेतील रहाळकर मंदिराच्या माडीवर दहा




बाय दहाच्या खोलीत भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी 'हे बोळातले विद्यापीठ बोळातच विसर्जित होणार' अशी टिंगलही माध्यमांनी आणि पुणेकरांनी केली. आरंभीच्या काळात गणित आणि इंग्रजी या विषयांतली विद्यार्थ्यांची गोडी वाढवून त्यांचा स्पर्धापरीक्षांसाठीचा आत्मविश्वास वाढविणे, त्यासाठी परीक्षा घेणे हा भारती विद्यापीठाच्या कार्याचा महत्त्वाचा भाग होता. डॉ.पतंगरावजी कदम साहेब यांची ध्येयनिष्ठा, अविश्रांत परिश्रम, गुणवत्तेचा ध्यास आणि दूरदृष्टी यांमुळे भारती विद्यापीठाच्या यशाचा आलेख सतत उंचावत राहिला. गेल्या साठ वर्षांत भारती विद्यापीठाने देशाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासात दिलेले योगदान मोलाचे आहे. देशभर शैक्षणिक संकुले असणारे, सर्व विद्याशाखांचे शिक्षण देणारे, ग्रामीण आणि शहरी संस्कृतीचा मिलाफ असणारे, महानगरांबरोबर ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागात दर्जेदार शिक्षणकेंद्रे उभी करुन तेथील घटकांना मुख्य प्रवाहात आणणारे, स्त्रियांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेणारे एक अपवादभूत विद्यापीठ म्हणून भारती विद्यापीठाचा नावलौकिक जगभर आहे. फीसाठी पैसे नसलेल्या एकाही गरीब विद्यार्थ्याचे शिक्षण भारती विद्यापीठाने अडू दिले नाही. डॉ.पतंगरावजी कदम साहेब यांची खासियत अशी की, विद्यार्थ्यांनी फी माफीसाठी आणलेल्या अर्जावर ते भेटतील त्या ठिकाणी तत्काळ स्वाक्षरी करीत. त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्वामुळे भारती विद्यापीठाला समाजमनात आदराचे स्थान मिळाले.

भारती विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळीच या विद्यापीठाचे विश्वविद्यालयात रूपांतर करण्याचे स्वप्न डॉ.पतंगरावजी कदम साहेब यांनी पाहिले होते. ते १९९६ साली प्रत्यक्षात उतरले. भारती विद्यापीठाला भारत सरकारने अभिमत विश्वविद्यालयाचा दर्जा दिला. गेल्या २८ वर्षांत भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाने गुणवत्तेच्या बळावर दैदीप्यमान कामगिरी करुन नामांकित विश्वविद्यालय म्हणून लौकिक मिळवला. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने ए-ग्रेड युनिव्हर्सिटी म्हणून उमटवलेली मोहर, नॅकने पुनर्मूल्यांकनात दिलेला अ+ दर्जा, एनआयआरएफमध्ये महाविद्यालयांनी मिळविलेले मानांकन या गोष्टी विश्वविद्यालयाच्या नावलौकीकात मानाचा तुरा खोवणाऱ्या आहेत. भारती विद्यापीठाचे विद्यार्थी आज जगभर विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. त्यांचे बहरलेले कर्तृत्त्व हीच भारती विद्यापीठाच्या कार्याची खरी पावती आहे. महात्मा फुले, श्रीमंत शाहू छत्रपती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, बापूजी साळुंखे, पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी महाराष्ट्रात निर्माण केलेल्या शिक्षण परंपरेचा वारसा डॉ.पतंगरावजी कदम साहेब यांनी समर्थपणे पुढे चालवत तो समृद्ध केला आणि शिक्षणातून समाजपरिवर्तनाचे (पान ३ वर....)

# वंदनीय महिलांचा आदर्श घ्यावा....

## निमित्त...

। लोकजागर ।

**आठ मार्चला जागतिक महिला दिन सर्वत्र उत्साहाने साजरा केला जातो. त्यानिमित्ताने....**




**गार्गी, मैत्रेयी यासारख्या गणिती तज्ज्ञ तसेच डॉ. आनंदी गोपाळ, सावित्रीबाई फुले यांसारख्या आदर्शवत स्त्रीया या भूमीतच नावारुपास आल्या. मार्गदर्शकही ठरल्या. रमाबाई रानडे याही आदर्श होत्या.**

आज सर्व क्षेत्रात महिला कोणत्याही स्पर्धेत पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तव्य, सेवा बजावित आहेत. तेवढीच त्यांची स्वातंत्र्याची जबाबदारी वाढत आहे; स्वत:ची आणि इतरांचीही.

अशावेळी थोडे इतिहासाकडे डोकावून पाहताना असे आढळते की, स्वातंत्र्यपूर्वकाळात संसाराच्या जबाबदाऱ्या पेलणाऱ्या आपल्याला तीन महान स्त्रीयांचा विसर पडतो. त्या तिघींना जरुर न्याय मिळाला पाहिजे. लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, बाबाराव सावरकर हे सर्व तुरुंगात असताना घराची जबाबदारी, मुलांचे संगोपन, त्यांच्यावर संस्कार घडविण्याचे महान कार्य या तिन्ही स्त्रियांनी जबाबदारीने, समर्थपणे पार पाडले ! त्या म्हणजे सत्यभामाबाई टिळक, यमुनाबाई विनायकराव सावरकर, येसूबाई गणेशपंत (बाबाराव) सावरकर. खरोखर त्या श्रेष्ठ आहेत. त्या वंदनीय आहेत. परंतु त्या उपेक्षीतच राहिल्या.

आज स्त्रीयांना स्वातंत्र्य भरपूर मिळाले परंतू त्यांच्यातला स्वैराचारही वाढला आहे. संस्काराचे, संस्कृतीचे विस्मरण झाले आहे. नविन, आदर्श पिढी घडविण्याची जबाबदारी त्यांचीच आहे. तुमचे आचार, विचार यावर तुमचे संस्कार अवलंबून आहेत. एक स्त्री एक पिढी घडवू शकते, साधेपणातही सौंदर्य असते याचा हल्ली तरुणींना व तरुणांनाही विसर पडला आहे.

स्त्री शक्तीचा जागर व्हायला हवा आहे. तिचा आदर व सन्मान व्हायला हवा. हे होत असताना महिलांनीही वंदनीय महिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवायला हवा.

सर्व महिला भगिनींना जागतिक महिला दिनाच्या खूप खूप शुभेच्छा !

■■■

**सौ. शैलजा बेडकिहाळ,**
कार्यकारी संपादिका, 'लोकजागर'.

# 'पशु'पालन

## कृषिभान...

। लोकजागर ।

**मानव हा मुलतः प्राणी आहे. मेंदूच्या विकसनाच्या टप्प्यावर त्याने वेगवेगळी 'जुगाडं' करून आपली संख्यात्मक, गुणात्मक वाढ केली. त्यातील शेती हा महत्त्वाचा प्रयोग आहेच, पण त्यासोबत त्याने आपल्याला फायद्याचे, गरजेचे वाटणारे इतर पशू आपल्या टोळीत समाविष्ट केले, मोठ्या संख्येने त्यांचे पालन केले.**

मानव हा मुलतः प्राणी आहे. मेंदूच्या विकसनाच्या टप्प्यावर त्याने वेगवेगळी 'जुगाडं' करून आपली संख्यात्मक, गुणात्मक वाढ केली. त्यातील शेती हा महत्त्वाचा प्रयोग आहेच, पण त्यासोबत त्याने आपल्याला फायद्याचे, गरजेचे वाटणारे इतर पशू आपल्या टोळीत समाविष्ट केले, मोठ्या संख्येने त्यांचे पालन केले.

शेती आणि पशुपालन हे दोन उद्योग मानवाच्या उत्क्रांतीच्या टप्प्यावर अत्यंत महत्त्वाचे स्थान राखून आहेत. शेतीने मानवाला स्थिर जीवन दिले, त्यात दुष्काळासारख्या काही अडचणी आल्या तेव्हा पशुपालनाने हातभार दिला, अशी शेतकरी आणि पशुपालकांची सहजीवनाची संस्कृती विकसित झाली. लोकर-मांस यांसाठी शेळी-मेंढी पालन आणि दुध-दुभत्यासाठी गाय-म्हैस पालन हे दोन ठळक प्रकार ह्या पशुपालनात सर्वसामान्य जनतेने रूढ केले आहेत.

राजे-महाराजे वगैरे लोकांनी शिकारीसारखे आपले मोठे शौक जपण्यासाठी आणि सत्तासंघर्षात टिकण्यासाठी आपल्या दिमतीला शिकारी कुत्रे, चित्ते पाळल्याचे दाखले जगाच्या इतिहासात सर्वत्र आहेत. हे पशु इतर प्राण्यांचे जीव घेण्याइतके हिंस्र असतात, सामान्य जनता जे पशू पाळते ते गरीब आणि आज्ञापालक असतात.

हल्ली शेतकरी आपल्या अर्थकारणाला बळ मिळावे म्हणून हा पशुपालनाचा जोडधंदा करत असले तरी काही दशकांपूर्वी हे दोन्ही वेगवेगळे, स्वतंत्र असे व्यवसाय होते.



शेतीच्या समस्यावाढीत ही फारकत लक्षात न घेतल्याने बरेच प्रश्न निमर्णि झाले आहेत. शेती फायद्यात नाही म्हणून पशुपालनाचा जोडधंदा करणे म्हणजे एकप्रकारे बेकरीचा धंदा चालत नसल्यास जोडधंदा म्हणून वडापावची गाडी टाकणे, त्यामुळे दोन्ही धंद्यांचा मिळून एकत्रित नफा वाढेल, असा प्रकार आहे. बेकरी आणि वडापावची गाडी हे दोन परस्परावलंबी धंदे आहेत, पण तरीही ते दोन्ही स्वतंत्र आहेत. असेच शेती आणि पशुपालन हे दोन पूरक पण स्वतंत्र व्यवसाय आहेत. यातील नंतरचा व्यवसाय म्हणजे पशुपालन किंवा वडापावची गाडी हे मुळच्या व्यवसायाचा वापर केवळ कच्चा माल मिळविण्यासाठी करतात. मूळ व्यवसाय शेती किंवा चालत नसलेल्या बेकरीचा नफा त्यातून वाढत नाही, याउलट हे मूळ व्यवसाय पूरक व्यवसायांवर जरा जास्तच अवलंबून राहायला लागतात.

### लेखांक ४२

सत्तरच्या दशकात 'धवलक्रांती' ची हाक दिली गेली, आणि दुग्धव्यवसाय बहरत गेला. अगोदर शेतकरी आपल्या कुटुंबाची दुधाची गरज भागेल अशी एखादी गाय वगैरे पाळायचा, एखादी बैलजोडी शेतीची कामे करण्यासाठी त्याच्या दावणीला असायची, चारदोन शेळ्या, दहा-बारा कोंबड्या असा त्याचा 'बारदाना' असायचा, पण शेती हा त्याचा मूळ व्यवसाय असायचा. नंतर शेती सोडून इतर सर्व दुध-मांस-अंडी ह्यांचे व्यवसाय भांडवली व्यवस्थेने कळसास पोहोचविले, शेती जशीच्या तशीच राहिली. जी शेती साखर कारखान्यांना पूरक राहिली तिची भरभराट झाली, इतरांच्या नशिबी 'बाजार' व त्यातील 'लिलाव'चक्र वाट्याला आले.

दुध आणि त्यापासून बनणारे पदार्थ पौष्टिक असतात, त्यांचे पोषणमुल्य जास्त असल्यामुळे मागणी जास्त असते. चिक, खरवस तर दुर्मिळ बाब त्यामुळे त्याचा दर चढता. त्यासाठी दीड-दोन दिवसाचे लेकरू 'सडा'पासून सोडवून चिकाची बाजारात रवानगी करण्याचे 'संस्कार' बाजाराने पशुपालकांच्यात रुजवले. तेच संस्कार आता शेतकऱ्यांतही ह्या पशुपालनाने प्रवाहीत केले आहेत, हे थोर कृषी संस्कृतीचे पतन होय. 'पोशिंदा' ह्या भूमिकेपासून शेतकऱ्याला दूर नेण्याचे हे काम आहे. शहरे आपल्याला सर्व 'शेलका माल' मिळावा अशी अपेक्षा करतात, त्यासाठी चढा दर देतात, मुल्यव्यवस्थेवर, संस्कृतीवर घाला घालतात म्हणून एक थोर पशुपालक गवळणींना मथुरेच्या बाजाराला जाण्यापासून रोखत होता, त्याचा आशय आपल्यात रुजलाच नाही! दुधाच्या पिशव्यांवर हल्ली त्या थोर पशुपालकाचेच नाव-फोटो जाहिरातीसाठी वापरले जातात ही त्याची विटंबना आणि आपली वैचारिक दिवाळखोरी म्हणावी लागेल.

दुधदर आणि ऊसदराची जोरदार आंदोलने होऊ लागली आणि याव्यतिरिक्त शेती असते, तिचेही प्रश्न आहेत, तेही सोडविले पाहिजेत हे भान शेतकरी संघटना आणि खुद्द शेतकरी विसरले. हरयाणा-पंजाबातील शेतकरी हे भान आजही बाळगून आहेत, त्यामुळे तिथे शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा प्रश्न निर्माणच झाला नाही, त्यामुळे तिथल्या राजकारण्यांना त्या प्रश्नाला आरक्षणाचे वळणही देता आले नाही, अस्मितेवर भांडवता आले नाही.

मानवही मुलतः प्राणीच आहे, त्याच्यातही गरीब, आज्ञापालक आणि शिकारीसाठी असे भेद आहेतच. गरीब, आज्ञाधारक पशूंनी आपल्या मताचा भाव लिलाव पद्धतीने मतदानाच्या दिवशी दुपारी ठरविण्याचे योजिले आहे, तर उद्योगपतींकडून खंडणी घेणाऱ्या शिकारी कुत्रे, चित्ते यांची मजल सरपंचाचे लचके तोडण्यापर्यंत गेली आहे.

■■■

**गोपाळ सरक**

सा. लोकजागर हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक सौ.अलका रविंद्र बेडकिहाळ यांनी ज्योर्तिलिंग प्रिंटींग प्रेस, शारदानगर, कोळकी, ता. फलटण ४१५ ५२३ जि. सातारा,महाराष्ट्र राज्य (भारत) येथे छापून ३२२, कसबा पेठ, फलटण ४१५ ५२३ जि. सातारा,महाराष्ट्र राज्य (भारत)येथे प्रकाशित केले. लेखात, निवेदनात, पत्रव्यवहारात व्यक्त मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबी उद्भवल्यास फलटण कोर्टात. अन्यत्र कोठेही नाही. संपादक : रोहित राजेंद्र वाकडे.
वार्षिक वर्गणी - रु. २०० फक्त ........ फोन नं. कार्यालय - (०२१६६) २२१११३, निवास - २२२३२१ ✻ कार्यकारी संपादक - सौ. शैलजा बेडकिहाळ
✻ व्यवस्थापकीय संपादक - सौ.अलका बेडकिहाळ ✻ सातारा प्रतिनिधी - श्री. गोविंद बेडकिहाळ सातारा कार्यालय - बिल्वदल, ७६ क, शुक्रवार पेठ, सातारा, फोन नं. २८२००७. ✻ पुणे कार्यालय - श्रीराम बेडकिहाळ, मौर्य विहार, बिल्डिंग नं. एफ १२, तुळजानंद सोसायटी, कोथरुड, पुणे - ३८. फोन. : (०२०) २५३८६२४५ E-mail Address -weekly_lokjagar@rediff.com

उजाळा...

# कणगी



‘अडगळीतील समृद्धी’

(पाक्षिक सदर) लेख : ०५

। लोकजागर ।

**खळ्यावर धान्याची रास लागली की, प्रथम त्या राशीची विधिवत पूजा केली जाते. नंतर खळ्यावरचं धान्य पांगवून चांगली तीन - चार उन्हं दिली जातात. एकदा धान्य वाळलं याची खात्री झाली की लगेच पुढची लगभग सुरु होते. खळ्यावरंच धान्याची एक - एक किंवा सव्वा - सव्वा मणाची पोती भरली जातात. एकदा सर्व धान्य भरून झालं की पोती मोजून ठरल्याप्रमाणे खोतीची वा वाट्याची वाटणी बाजूला काढली जात असे. आमचे वडील दरवर्षी कोयना भैजींची खोती घेत असत. त्यामुळे वाटणीवेळी आम्हीही खळ्यावरच असायचो. आधी खोतीवाल्याचा माल त्यांच्या घरी पोहोच करायचा असा भैजींचा दंडक. त्यामुळे मालाने भरलेल्या बैलगाडीत बसून आम्हीही घराकडे निघायचो. आपल्या घरी आज धान्य येणार याचा लई आंनद व्हायचा आम्हाला. घरी आई पुन्हा एकदा बैलांसह पोत्यांचीही पूजा करायची. खोतकरांचा माल त्यांच्या घरी जाईपर्यंत भैजीला चैन पडत नसे. त्यामुळे भैजी स्वत: बैलगाडीबरोबर खोतकराच्या घरापर्यंत जात असत. खोतकरांचा माल त्यांच्या घरात पडला की मग खळ्यावरचा उरलेला सगळा माल भैजींच्या वाड्यावर नेला जात असे. एकदा ओसरीला पोत्यांची थापी लागली की, मग पुढं भैजी कणगीच्या तजविजीला लागत.**

कणगी म्हणजे त्याकाळी धान्य सुरक्षित आणि सुस्थितीत ठेवण्याचं एक महत्वाचं साधन. आमच्या गावात प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी कणगी असायची. शेतकरी छोटा असो वा मोठा त्याच्याकडे कणगी हमखास असायचीचं. प्रतिवर्षी शिवारात होणारे धान्याचे उत्पादन लक्षात घेऊन कणगी करून घेतली जात असे. विशेषतः ज्वारी, बाजरी आणि गहू ही अन्नधान्ये साठवण्यासाठी कणगी वापरली जात असे. कमीत कमी पाच तर जास्तीत जास्त वीस मण धान्य साठवलं जाईल अशा आकाराच्या कणग्या त्याकाळी असत. मोठ्या जमीनदाराकडं तर अशा दोन - तीन कणग्या असायच्या. कणग्यांच्या आकारावरून त्याकाळी श्रीमंतीचं मोजमाप देखील केले जात असे. पतींगराव जामदारांच्या वाड्यात अशा खंडी, दोन खंडीच्या मोठमोठ्या कणग्या त्याकाळी होत्या. एकदा कणगीत माल पडला की मग मात्र शेतकरी निसूर होत असत.

साधारण डोक्याएवढ्या उंचीची व रांजनासारख्या आकाराची दिसणारी ही कणगी बांबूपासून बनवली जात असे. कणगी विणण्याचे काम बुरुड लोक करत असत. आमच्या पंचक्रोशीत त्याकाळी धनुदादा कणगी बनवण्यासाठी नावाजले जात होते. दादा सर्वप्रथम बांबूपासून जाड, पातळ, चपट्या आकाराच्या पट्ट्या सोलून काढत असत. कणगी बांधताना सुरुवातीला कणगीचं बूड बांधलं जायचं. हे बुड साधारण वाव - दीड वाव व्यासाचं गोलाकार असे. यासाठी बांबू सोलून काढलेले लांब चपट्या आकाराचे पण जाडसर व मजबूत असे तोडे वापरले जात असत. दणकट व टिकाऊ कणगीसाठी नऊ तोडे वापरले जात असत. सर्वप्रथम हे नऊ तोडे मध्यावर एकत्र घट्ट बांधले की एका तोड्याचे दोन भाग होत असत. या भागांना पाऊके म्हटले जात असे. अशा प्रकारे नऊ तोड्यांचे अठरा पाऊक सुरुवातीला तयार होत असत.

त्यानंतर ही सर्व पाऊके एका मजबूत चपट्या कामठीने विणले जायचे. त्यास बेळसा असे म्हटले जात असे. बुडाचा असा वाव- दीड वाव व्यासाचा गोलाकार भाग या बेळसांनी विणला की जेथून पाऊके वरच्या दिशेला वळवले जातात तिथे एक वळ विणला जात असे. हा वळ तीन पात्यांचा किंवा काड्यांचा असे. या काड्यांना वळकाडी असं म्हटले जात असे. अशा वळामुळे बुडाचा भाग मजबूत व्हायचा. येथून कणगीच्या उभ्या भागाला सुरुवात व्हायची. नंतर सर्व अठरा उभे पाऊके मग पुन्हा बेलस्यांनी विनले जायचे. साधारण वीत - दीड वितीवर पुन्हा एक वळ विणला जायचा. यामुळे कणगीला भक्कम व मजबूतपणा येत असे. बुडाच्या आकारापेक्षा कणगीचा मधल्या भागाचा व्यास थोडासा मोठा व तोंडाचा थोडासा लहान असायचा. त्यामुळे धान्याचे वजन संतुलित राहत असे.

अशा रितीने साधारण सहा - सात फूट उंचीपर्यंत कणगी विणली जात असे. पाऊके वितभर वर राहतील अशा बेताने शेवटचा मोठा वळ विणला जात असे. त्यास तोंडाची मुदन म्हटले जात असे. नंतर वर शिल्लक राहिलेले पाऊके थोडे तासून पातळ केले जात. हे पाऊके वरून मुडपून पुन्हा शेवटच्या वळातून आतल्या बाजूने खोवले म्हणजेच पाचले जात असत. अशा रितीने कणगीचं तोंड तयार होत असे. कणगीत धान्य भरण्याआधी ती ओसरीत किंवा आत घरात व्यवस्थित स्वच्छ व हवेशीर जागेत ठेवली जात असे. जमिनीवर लाकडे टाकून त्यावर लाकडी फळ्या अंथरून त्यावर कणगी ठेवली जात असे. अशा कणगीत वर्षभराची सर्व चंदी एकदम सुरक्षित राहत असे. दादाकडून अशी कणगी एकदा करून घेतली की ती सालोसाल टिकायची. अशा कणगीसाठी दादा जीव लावून मेहनत घेत असत. दादाच्या हातच्या अशा कितीतरी कणग्या गावोगावी आणि घरोघरी दिसायच्या.

धान्य टाकण्याआधी कणगी माती, गवत, शेणाच्या मिश्रणाने आतून बाहेरून लिपली जात असे. कणगी मजबूत आणि हवेशीर जागेवर ठेवली जात असल्यामुळे तिच्यात धान्य दीर्घकाळ टिकत असे. शिवाय कणगीमुळे धान्याचे किडा, मुंगी पासूनही संरक्षण होत असे. कणगीत धान्य टाकण्या आधी ते पूर्णत: वाळवले जात असे. धान्य कणगीत टाकले आणि कणगीचे तोंड लिंबाचा पाला टाकून वरून पुन्हा शेणाने लिपले की, धान्य अगदी तिजोरीत ठेवल्यासारखे सर्वांगाने सुरक्षित होत असे. अशारितीने नैसर्गिकपणे सुरक्षित धान्य साठवण्याचं कणगी हे अत्यंत उपयुक्त असे साधन होते. कृषीसंस्कृतीत अशा कणगीत धान्य साठवण्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे.

भारतात प्राचीन काळापासून स्थानिक हवामान, जमीन, आणि उपलब्ध साधन सामग्रीनुसार धान्य साठवण्यासाठी विविध पारंपरिक पद्धती वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये विकसित झालेल्या दिसतात. काही ठिकाणी धान्य साठवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर ‘कोठी’ किंवा ‘कोठारे’ वापरण्यात येत असत. यासाठी माती, लाकूड, बांबू, किंवा दगडांचा वापर केला जात असे. मातीच्या भांड्यांमध्ये धान्य साठवण्याची पद्धतही काही भागांमध्ये प्रचलित होती. या भांड्यांना आतून तेलकट पदार्थांनी लिंपले जाई, ज्यामुळे त्यात किडी होत नसत. विशेषतः गहू, तांदूळ आणि डाळींचे साठवण यामध्ये केले जात असे.

पूर्व भारत, पश्चिम घाट आणि ईशान्येकडील प्रदेशात बांबूच्या मोठ्या टोपल्या धान्य साठवण्यासाठी वापरल्या जात. या टोपल्यांना शेण आणि मातीच्या थराने लिंपले जात असे. काही ठिकाणी धान्य सुती पोत्यांमध्येही साठवले जात असे. काही भागांत छताला वारा खेळता राहील अशा पद्धतीने खपरेल बसवून धान्य साठवण गृह तयार केले जात असे. काही ठिकाणी लाकडी पेट्या, किंवा झाडाच्या खोडापासून खोदलेल्या मोठ्या खोल्यांमध्येही धान्य साठवले जात असे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात धान्य साठवण्याचे साधन म्हणून ‘कणगी’ चा वापर केला जात असे. कालानुसार कणगीच्या निर्मितीत आणि वापरात काही महत्त्वाचे बदल झालेले दिसतात.

प्राचीन काळात सिंधू संस्कृतीमध्ये हडप्पा आणि मोहेंजोदडो येथे आढळलेल्या धान्यागारांमध्ये कणगी समान काही लहान साठवण यंत्रणा असल्याचे पुरावे मिळतात. वैदिक काळातील वाङ्मयात ‘कोष्ठ’ किंवा ‘कोष्ठागार’ असा कणगीच्या संकल्पनेशी जुळणारा उल्लेख सापडतो. त्या काळात मातीच्या मोठ्या घटांमध्ये धान्य साठवले जात असे, ज्यामध्ये कणगीसारखी रचना होती. मौर्य आणि गुप्त काळात कौटिल्याच्या ‘अर्थशास्त्र’ या ग्रंथात धान्य साठवण्याच्या विविध पद्धतींचा उल्लेख आहे. याकाळात कणगीसारखी मोठी मातीची भांडी वापरली जात असत. ही भांडी हवेशीर आणि दमटपणापासून संरक्षित असत. या काळात घरगुती साठवणुकीसाठी लहान कणग्यांचा वापरही अधिक प्रमाणात होत असे.

मध्ययुगीन काळात घरगुती आणि गावपातळीवर धान्य साठवण्यासाठी कणगीसारख्या मातीच्या भांड्यांचा मोठा उपयोग होत असे. काही ठिकाणी बांबूच्या चौकटींना शेणमातीचे मिश्रण लावून मोठ्या ‘कणगी’ सारख्या वस्तू तयार केल्या जात असत. यामध्ये विशेषतः तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी यांची दीर्घकालीन साठवणूक होत असे. मराठा आणि पेशवे काळात शेतकऱ्यांसाठी धान्य साठवणुकीच्या पारंपरिक पद्धती प्रचलित होत्या. मोठ्या कोठारांमध्ये आणि घरगुती कणग्यांमध्ये धान्य साठवले जात असे. या काळात कणगी बांधताना बाहेरून गेरू लावण्याचीही प्रथा होती, ज्यामुळे ती अधिक टिकाऊ होत असे.

ब्रिटिशकालीन भारतात मोठ्या प्रमाणावर धान्य साठवण्यासाठी ब्रिटिश सरकारने आधुनिक गोदामे आणि लोखंडी संरचना आणल्या, पण ग्रामीण भागात कणगीचा वापर सुरूच राहिला. काही ठिकाणी मातीऐवजी लाकडाच्या कणग्या वापरण्यास सुरुवात झाली. धान्य टिकवण्यासाठी कणगीत निंबाची व इतर वनस्पतीची पाने यांचा उपयोग होऊ लागला. स्वातंत्र्योत्तर भारत आणि आधुनिक काळात आधुनिक गोदामे उपलब्ध झाल्यानंतरही ग्रामीण भागात कणगीचा वापर होत असे. मात्र या काळात काही ठिकाणी प्लास्टिक किंवा सिमेंटपासून तयार केलेल्या कणग्या वापरण्यात येऊ लागल्या.

काळानुरूप महाराष्ट्रातही अशाप्रकारे धान्य साठवण्याच्या विविध साधन सामग्रींचा वापर केला जात होता. याकाळात महाराष्ट्रात विशेषतः कणगी हेच पारंपरिक पद्धतीने धान्य साठवण्याचे प्रमुख साधन म्हणून अधिक प्रमाणात वापरले जात असे. याकाळात महाराष्टात ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ इ. पिकांचे उत्पादन अधिक प्रमाणात घेतले जात असे. कृषी पणन व विपणनाची व्यवस्था त्याकाळी प्रभावी नसल्याने ही सर्व धान्य घरातच साठवली जात असत. यासाठी कणगी खूप महत्त्वाची भूमिका बजावत असत. कणगीमधील धान्य बराच काळ सुरक्षितपणे टिकत असल्यामुळे अस्मानी संकटात ते उपयोगी ठरत असे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात देखील महाराष्ट्रात पारंपरिक शेती केली जात होती. साखर कारखाने, औद्योगिकीकरण, सिंचन प्रकल्प यामुळे शेती व्यावसायला काही प्रमाणात चालना मिळू लागली होती. मात्र याकाळातही कणगीचा वापर बऱ्याच प्रमाणात केला जात होता. यानंतरच्या काळात मात्र कणगीचा वापर हळूहळू कमी होत गेला.

साधारणपणे हरितक्रांती नंतरच्या काळात आधुनिक तंत्रज्ञान आणि कृषीक्षेत्राशी संबंधित विविध शासकीय धोरणे आणि विविध जलसिंचन प्रकल्प यामुळे शेती व्यवस्थापनात कमालीचे बदल झाले. यांत्रिक साधने, अत्याधुनिक अवजारे, संकरीत बियाणे, आधुनिक पिक व पाणी पद्धती यामुळे पारंपरिक शेती हळूहळू कमी होत गेली. नगदी पिकांचे प्रमाण व संख्याही वाढत गेली. बाजार समित्यांची निर्मिती झाल्यामुळे धान्य साठवून ठेवण्यापेक्षा विकण्याचं प्रमाण वाढलं. अन्नधान्यांच्या आयात - निर्यातीमुळे धान्याची उपलब्धता वाढली गेली. बाजारात सर्व प्रकारचे धान्य मिळू लागल्याने शेतकऱ्यांचा कल अन्नधान्य पिकविण्यापेक्षा नगदी पिकाकडेच अधिक वळला. ज्वारी, बाजरी, गहू यांचे उत्पादन गरजेपुरते किंवा मर्यादित होऊ लागले. त्यामुळे ओसरीतील कणगीने तळ गाठला.

जसजसा काळ पुढे सरकू लागला तसतसा आधुनिकतेचा प्रवाह अधिकच जोम धरू लागला. नगदी पिकांमुळे तसेच सहज कर्ज उपलब्ध होऊ लागल्याने शेतकऱ्यांचा हाती पैसा खेळू लागला. कृषी क्षेत्रातील प्रगतीमुळे भौतिक साधनांची खरेदी आधुनिक जीवनशैलीचा अंगीकार होऊ लागला. याशिवाय शेती पूरक व्यवसाय, विविध क्षेत्रातील रोजगारांची उपलब्धता यामुळे पारंपरिक शेती व जीवनशैलीत कमालीचा बदल झाला. आहार, विहार, निवाऱ्याची साधनात आधुनिकता दिसू लागली. चौसोपी वाडे , धाब्याची घरे जाऊन त्याठिकाणी वाळू, गज, सिमेंटचे बंगले उभे राहू लागले. धान्य साठवण्याची नवनवी साधने आज बाजारात येऊ लागली आहेत. घराची खोली, आकार, रंग आणि चकचकितपणाला शोभेल अशी आधुनिक धान्य साठवण साधने आता घरात दिसू लागली आहेत. त्यातच घराच्या अघळ - पघळ वट्टा - ओसरीची जागा बंगल्याच्या चकचकित पोर्चने बळकावली आणि ओसरीतील दिमाखदार कणगी आता अडगळीत जाऊन पडली आहे.

एकेकाळी सर्वांना पोट भरून धान्य पुरवणारी कणगी आज स्वतःच रिकामी होऊन अखेरच्या घटका मोजताना दिसत आहे. स्वतःच्या भक्कमतेबरोबरच मालकाच्या सक्षमतेचाही परिचय करून देणारी कणगी आता मात्र खिळखीळी झालेली दिसत आहे. घरा- ओसरीत भरलेली कणगी एकेकाळी श्रीमंतीचं आणि समृद्धीचं प्रतिक समजली जात असे. अडी- नडीच्या काळात पाव्हणे- रावळे, गरीब, भिक्षेकरू यांच्याप्रति धन्याच्या ठायीच्या औदार्य आणि सहकार्यवृत्तीला बळ देणारी ही कणगी स्वतःच आज आधारहीन झालेली दिसत आहे. कणगी लिपताना, तिच्यात धान्य भरताना, तिच्यातून धान्य काढताना तिच्याशी एक वेगळंच नातं जुळले जात असे. लहान मुलांना तर कणगीतून धान्य काढायला खूप मज्जा येत असे. तिच्यातील गारवा हवाहवासा वाटत असे. हा आनंद आज लोप पावत चालला आहे.

वर्षानुवर्षे सर्व प्रकारचे धान्य सुरक्षित, ठेऊन सर्वत्र समृद्धीचं भरलेपण बहाल करणाऱ्या कणगीचं एकेकाळी मानवी जीवनात महत्वपूर्ण स्थान होतं. काळ्या आईच्या कुशीतून मिळालेलं धन्याच्या कष्टाचं सोनं इमाने, इतबारे, चोख आणि सुरक्षित ठेवण्याचं अनमोल कार्य कारणारी कणगी ही निष्ठेची परिसिमा होती. म्हणूनच ग्रामीण तथा कृषी संस्कृतीला आपल्या कर्तव्याने समृद्धीचं दान देणारा हा पारंपरिक वारसा जपण्याचं कार्य व्हायला हवं. कणगीमुळेच तोडा, पाऊक, बेलसी, वळ इ. सामग्रीची एक साठवण संस्कृती निर्माण झाली. कणगी अस्तंगत झाली तर ही धान्य रक्षक संस्कृतीही लय पावेल. म्हणूनच हा ग्रामजीवनाला शतकानुशतके आधार देणारा कृषी संस्कृतीचा वारसा आणि सुख - समृद्धीचा साक्षीदार आपणास जपून ठेवायलाच हवा. बस्स एवढीच अपेक्षा !

■■■

**प्रा.डॉ.अशोक शिंदे,**
फलटण.



# राजकीय क्षितीजावरचा सोनहिरा

(.... पान २ वरुन)

क्रांतिकारी कार्य केले. पुणे विद्यापीठाच्या सिनेट व कार्यकारी परिषदेवर तर मुंबई विद्यापीठाच्या विधी सभेतून बोर्ड ऑफ मॅनेजमेंट वरती त्यांची निवड झाली होती. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे तसेच मॅनेजिंग कौन्सिलचे ते सदस्य होते. रयत शिक्षण संस्थेशी त्यांचा स्नेह अखेरच्या श्वासापर्यंत होता.

स्व.यशवंतरावजी चव्हाण, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते यांचा राजकारणात सामान्य माणसाला केंद्रबिदू मानून समाजकारण करण्याचा वारसा डॉ. पतंगरावजी कदम साहेब यांनी समर्थपणे पुढे चालविला. एस.टी. बोर्ड मेंबर म्हणून संस्मरणीय कामगिरी करणाऱ्या डॉ.पतंगरावजी कदम साहेब यांनी ‘गाव तेथे एस.टी.’ ही योजना प्रभावीपणे राबवून खेड्यापाड्यापर्यंत एस.टी. नेली. १९८५ साली त्यांची भिलवडी - वांगी मतदारसंघातून प्रथम आमदार म्हणून निवड झाली. या दुष्काळी भागाचे त्यांनी विविध विकास योजना राबवून अक्षरश: नंदनवन केले. त्यांनी या भागात उद्योगधंद्यांचे मोठे जाळे उभे केले. सोनहिरा सहकारी साखर कारखाना, भारती बँक, हॉस्पिटल्स, सूतगिरण्या उभ्या करुन ग्रामीण विकासाला गती दिली. हजारो हातांना रोजागर मिळवून दिला. डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या रुपाने महाराष्ट्र काँग्रेसला एक खंबीर नेतृत्त्व मिळाले. १९९१ साली राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांचा शिक्षण व पाटबंधारे खात्याचे मंत्री म्हणून समावेश झाला. १९९१ - ९४ या काळात राज्याचे शालेय शिक्षण तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाचे कॅबिनेट मंत्री म्हणून काम करताना त्यांनी एकशिक्षकी शाळा बहुशिक्षकी केल्या. शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी ग्रामीण भागात २७०० शाळा सुरु केल्या. विनाअनुदानित तत्वावर चालणाऱ्या आणि उत्तम शिक्षण देणाऱ्या शाळांना प्रोत्साहन देण्यासाठी २५% सरकारी अनुदान देण्याची घोषणा करुन त्याची अंमलबजावणीही केली. इंग्रजी माध्यमांसहित सर्व शाळांमध्ये मराठी विषय बंधनकारक करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. १९९९ मध्ये राज्याचे उद्योग, व्यापार, वाणिज्य, जलसंपदा व संसदीय कामकाज खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून काम करताना सतत दुष्काळाचा सामना करणाऱ्या आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य असणाऱ्या जिल्ह्यांत कायमस्वरूपी सिंचनाची व्यवस्था करणाऱ्या प्रकल्पांची उभारणी त्यांनी केली. उपसा जलसिंचनाद्वारे कृष्णेचे पाणी उचलून कालव्यांद्वारे दुष्काळी भागात नेण्याचे कठीण स्वप्न त्यांनी सत्यात उतरवले. त्यातूनच टेंभू, ताकारी, म्हैसाळ यांसारख्या योजनांतून उजाड माळरानावर समृद्धी आली. उद्योगक्षेत्राला चालना देताना त्यांनी कृषिपूरक उद्योगांना अर्थसहाय्य केले. उद्योगांना महाराष्ट्रात आकर्षित करण्यासाठी एफ.एस.आय. दुपटीने वाढविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. जैवतंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना चालना दिली. त्यातून हिंजवडी येथील आयटी पार्कची उभारणी झाली. सन २००४ मध्ये सहकार, पुनर्वसन व मदतकार्य खात्याचे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्यानंतर त्यांनी सहकाराचा पाया मजबूत करण्यासाठी दूरगामी निर्णय घेतले. नव्या उद्योगनिर्मितीला चालना दिली. सर्व जिल्ह्यांत उद्योगभवनांची उभारणी केली. कालबाह्य कायदे रद्द करुन त्यांची कालसुसंगत पुनर्रचना केली. नवीन तलाठी व मंडल कार्यालयाची निर्मिती केली. शेतकऱ्यांना अल्प दराने पीक कर्ज देण्याचा निर्णय घेतला. सन २००९ मध्ये वनमंत्री म्हणून काम करताना त्यांनी रोजंदारीवर काम करणाऱ्या ६५०० वनसेवकांना शासकीय सेवेत सामावून घेतले. त्यांच्या कार्यकाळात राज्यांतील वाघांची संख्या वाढल्यामुळे ‘टायगर स्टेट’ या पुरस्काराने राज्याचा गौरव झाला. वर्षानुवर्षे रखडलेल्या अभयारण्यातील बारा गावांचे पुनर्वसन करुन ताडोबा, मेळघाट सारखे व्याघ्र प्रकल्प विकसित करुन त्यांनी ते जगाच्या नकाशावर आणले. आधीच्या भिलवडी - वांगी आणि नंतरच्या पलूस - कडेगाव मतदारसंघाचे आमदार म्हणून तीस वर्षे (सह टर्म) विधिमंडळात त्यांनी प्रतिनिधीत्व केले.

विविध खात्यांची मंत्रिपदे भूषविताना सामान्यांच्या हिताचे निर्णय तत्काळ घेण्याची क्षमता, प्रशासनावर असलेला वचक आणि सामान्य माणसांविषयी असणारी सहृदयता यांमुळे जनसामान्यांच्या हृदयात त्यांना लोकनेत्याचे स्थान मिळाले. कसलीही कौटुंबिक, आर्थिक, राजकीय पार्श्वभूमी नसताना, राजकारणात शून्यातून आपले विश्व उभे करणारे डॉ.पतंगरावजी कदम साहेब हे इथल्या मातीने घडविलेले अस्सल आणि स्वयंभू नेते होते. सामान्यातल्या सामान्य माणसांची दु:खे पाहून ओलावणारे डोळे आणि गहिवरणारे अंत:करण हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती. आपल्या अंगभूत तेजाने चाळीस वर्षे महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर तळपणारा हा ‘सोनहिरा’ ‘कोहिनूर’ होण्यासाठी ०९ मार्च, २०१८ रोजी स्वर्गस्थ झाला. त्यासाठी ही तेजांजली.

■■■

# विनम्र अभिवादन

आदरणीय साहेब,
आजही तुमची स्मृती प्रत्येक क्षणी आठवण
त्या आठवणींची ही अमृत साठवण....

स्मृतीदिन
दि.९ मार्च



## डॉ.पतंगराव कदम साहेब

ज्येष्ठ नेते व माजी मंत्री (शिक्षण, महसूल, सहकार, उद्योग, वने, जलसंधारण,
संसदीय कार्य आणि मदत व पुनर्वसन), महाराष्ट्र राज्य
संस्थापक - कुलपती, भारती विद्यापीठ व भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे

(८ जानेवारी १९४४ - ९ मार्च २०१८)

'' रॉबर्ट फ्रॉस्ट हा जागतिक तत्त्ववेत्ता म्हणतो, रुळलेला रस्ता सोडून, न तुडविलेल्या वाटेवरुन जे चालत राहतात त्यांच्या जगण्याला वेगळा अर्थ प्राप्त होतो. असे महानुभव म्हणजे अंधारात उजेड दाखवणारे नक्षत्रांचे काजवेच. त्यांची कार्यक्षेत्रे म्हणजे प्रकाशाची बेटे, नवी तीर्थस्थाने.''

साहेब आपले कार्यही असेच आहे.

**आपणास सातव्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन !**

प्राचार्य, प्राध्यापक, अधिकारी वर्ग व शिक्षकेतर सेवक

**भारती विद्यापीठ,** पुणे | **भारती विद्यापीठ,** (अभिमत विश्वविद्यालय), पुणे